# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय
# व
# मेट, भुजबळ नॉलेज सिटी
# यांच्या संयुक्त विद्यमाने

आयोजित

जिल्हास्तरीय/विभागीय

# युवा महोत्सव
# २०१६

**दि. २७,२८,२९ नोव्हेंबर. २०१६**

**ठिकाण: मेट, भुजबळ नॉलेज सिटी, आडगाव नाशिक**

**वयोगट १३ ते ३५**








| | | |
|---|---|---|
| लोकनृत्य | हार्मोनियम (लाईट) | |
| लोकगीत | गिटार | |
| एकांकिका (इंग्रजी/हिंदी) | मणीपुरी नृत्य | |
| शास्त्रिय गायन (हिंदुस्तानी) | मृदंग | |
| शास्त्रिय नृत्य | भरत नाट्यम | |
| सितार | कथ्थक | वक्तृत्व |
| बासरी | कुचीपुडी नृत्य | |
| तबला | वीणा | ओडिसी नृत्य |

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय

THE MET LEAGUE OF COLLEGES
**MET Bhujbal Knowledge City**
AS SHARP AS YOU CAN GET

अधिक माहितीसाठी संपर्क
छत्रपती शिवाजी स्टेडियम, हुतात्मा स्मारकाजवळ, सी.बी.एस., नाशिक | दुरध्वनी क्रमांक - ०२५३ २५७७७१९

महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय

छत्रपती शिवाजी स्टेडियम, हुतात्मा स्मारकाजवळ, सीबीएस, नाशिक, दुरध्वनी क्रमांक -०२५३२५७७७१९

## जिल्हास्तरीय युवक महोत्सव सन २०१६-१७

## प्रवेश अर्ज

फोटो

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्पर्धकाचे संपूर्ण नाव – | | | | | | | | | |
| संस्था /शाळेचे / महाविद्यालयाचे नाव – | | | | | | | | | |
| वय – | | | | | | | | | |
| जन्मदिनांक – | | | | | | | | | |
| सहभागी बाब | लोकनृत्य | लोकगीत | एकांकिका (इंग्रजी/हिंदी) | शास्त्रीय नृत्य | सितार | बासरी | तबला | वीणा | मृदंग |
| | हार्मोनियम (लाईट) | गिटार | मणीपुरी नृत्य | ओडिसी नृत्य | भरत नाट्यम | कथ्थक | कुचीपुडी नृत्य | वक्तृत्व | शास्त्रीय गायन (हिंदुस्तानी) |
| पत्ता - | | | | | | | | | |
| मोबाईल क्रमांक - | | | | | | | | | |
| संघ व्यवस्थापकाचे नाव व मोबाईल क्रमांक | | | | | | | | | |

सोबत - वयाच्या दाखल्याची छायांकित प्रत सोबत ठेवणे.

स्पर्धकाची स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय

छत्रपती शिवाजी स्टेडियम, हुतात्मा स्मारकाजवळ, सीबीएस, नाशिक

---

जा.क्र.जिक्रीअ/जिल्हा युवा महोत्सव /२०१६-१७/का. ७ / दि. १५ नोव्हेंबर २०१६

**प्रति,**

मा. ------------------------------------

----------------------------------------

**विषय :- जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजनाबाबत २०१६-१७**

उपरोक्त विषयान्वये सविनय कळविण्यात येते की, राज्यातील युवांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत करणे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून युवा वर्गांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी केंद्र शासनामार्फत सन १९९४ या वर्षापासून दरवर्षी दिनांक १२ जानेवारी रोजी राष्ट्रीयस्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते देशातील विवीध राज्यातील सांस्कृतिक व परंपरा जतन करुन या संस्कृतीचे संवर्धन करणारा प्रातिनिधीक युवा संघ वरील राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होतो.

राज्याचा संघ निवडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा, विभागीय स्तरावर युवा महोत्सवांचे आयोजन होऊन विभागाचे संघ राज्यस्तर युवा महोत्सवात सहभागी होतात. राज्यभरातील गुणी कलावंतांमधून राज्याच्या संघाची निवड केली जाते व हा संघ राष्ट्रीय युवा महोत्सवात महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करतो.

सन २०१६-१७ या वर्षात जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व एमईटी , भुजबळ नॉलेज सिटी यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. जिल्हास्तर युवा महोत्सवाच्या कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

**<u>जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन पुढील प्रमाणे करण्यात येत आहे.</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | युवा महोत्सवाचे ठिकाण | भुजबळ नॉलेज सिटी, आडगांव, नाशिक |
| २ | युवा महोत्सव कालावधी | २७ ते २८ नोव्हेंबर २०१६ |
| ३ | उपस्थिती दिनांक | २७ नोव्हेंबर २०१६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत |

- उपरोक्त नियोजनाप्रमाणे स्पर्धकांनी पुढील संख्येच्या अधिन राहुन वेळेत उपस्थित राहावे .
- सहभागी कलांकारांसाठी वयोगट १३ ते ३५ वर्षे

**<u>युवा महोत्सवाकरीता स्पर्धा बाब ,संख्या व वेळ पुढीलप्रमाणे आहे.</u>**

| अ.क्र | स्पर्धा बाब | कलाकार संख्या | वेळ मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | लोकनृत्य | २० (साथीदारासह) | १५ मिनिट |
| २ | लोकगीत | ०६ | ७ मिनिट |
| ३ | एकांकिका (इंग्रजी/हिंदी) | १२ | ४५ मिनिट |
| ४ | शास्त्रीय गायन ( हिंदुस्तानी) | ०१ | १५ मिनिट |
| ५ | शास्त्रीय नृत्य | ०१ | १५ मिनिट |
| ६ | सितार | ०१ | १५ मिनिट |
| ७ | बासरी | ०१ | १५ मिनिट |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | तबला | ०१ | १० मिनिट |
| ९ | वीणा | ०१ | १५ मिनिट |
| १० | मृदंग | ०१ | १० मिनिट |
| ११ | हार्मोनियम (लाईट) | ०१ | १० मिनिट |
| १२ | गिटार | ०१ | १० मिनिट |
| १३ | मणीपुरी नृत्य | ०१ | १५ मिनिट |
| १४ | ओडिसी नृत्य | ०१ | १५ मिनिट |
| १५ | भरत नाट्यम | ०१ | १५ मिनिट |
| १६ | कथ्थक | ०१ | १५ मिनिट |
| १७ | कुचीपुडी नृत्य | ०१ | १५ मिनिट |
| १८ | वक्तृत्व | ०१ | ०४ मिनिट |

**कलाकारांना द्यावयाच्या सूचना –**

१. सहभागी कालाकारांचे वय १३ ते ३५ वयोगटातील असावे व वयाचा पुरावा सादर करावयाचा आहे.
२. युवा महोत्सवामध्ये सहभागी होणा-या युवा कलाकारांनी आपणास आवश्यक असणारे साहित्य / वाद्य / ड्रेपरी इ. स्वखर्चाने व स्व जबाबदारीने आणावयाचे आहे.
३. मौल्यवान वस्तू हरवल्यास / गहाळ झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी वैयक्तिक त्या संबंधीतांची राहिल. आयोजन समिती त्यास जबाबदार असणार नाही.
४. उशिरा येणा-या कलाकारांना कला सादरीकरण करण्यास परवानगी नाकारण्यात येईल.
५. युवा महोत्सवाचे कालावधीत कलाकारांनी महोत्सवाचा आनंद लुटावा ,महोत्सवाचे ठिकाणचे पावित्र्य विचारात घेवून गैरवर्तन होणार नाही याची काळजीही घ्यावयाची आहे.
६. एखादी स्पर्धा सुरू असतांना विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास स्पर्धा आहे त्या परिस्थितीत चालू ठेवावयाची किंवा सुरुवातीपासून घ्यावयाची याबाबतचा निर्णय आयोजन समितीकडे राहिल.
७. परीक्षणाबाबत कुठलाही आक्षेप घेता येणार नाही.
८. प्रतिस्पर्धी कलाकारांबाबत काही आक्षेप असल्यास योग्य त्या पुराव्यावर रुपये ५००/- अनामत भरुन त्याच ठिकाणी आक्षेप सिध्द करावा लागेल.
९. कलाकारांना कला सादर करतांना वा या संबंधीत कार्य करीत असतांना इजा किंवा दुखापत झाल्यास आयोजन समिती जबाबदार राहणार नाही.
१०. सहभागी कलाकारांनी आपल्या वयाबाबतचा दाखला सोबत आणणे आवश्यक आहे.
११. एका संस्थेने एका बाबीसाठी एकच प्रवेशिका पाठवावी.
१२. **युवा महोत्सवाच्या ठिकाणी पोहचण्याचा प्रवास मार्ग** - स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणा-या स्पर्धकांसाठी विभागीय क्रीडा संकुल, हिरावाडी रोड, पंचवटी , नाशिक येथून विनामूल्य बस सेवा सकाळी ८.३० वाजता उपलब्ध करून देण्यात येईल.
१३. **संपर्कासाठी मोबाईल नं. - श्रीमती. रेखा परदेशी , क्रीडा अधिकारी - ९९२३६१९२३५**
१४. **प्रवेश अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात उपलब्ध असून दिनांक – २४ नोव्हेंबर २०१६ रोजी पर्यंत प्रवेश अर्ज भरून कार्यालयात सादर करावे.**

**(संजय सबनीस)**
जिल्हा क्रीडा अधिकारी
नाशिक

# जिल्हा व विभागीयस्तर युवा महोत्सव २०१६-१७ करीता आयोजन समितीमार्फत निश्चित करण्यात आलेली नियमावली

- स्पर्धकांनी **स्पर्धेसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य स्वतः सोबत आणणे आवश्यक आहे**. उदा . **ड्रेस/ड्रेपरी, मेकअप किट** , **वादय** , प्रॉप्स आदि. यापैकी कोणत्याही प्रकारचे साहित्य स्पर्धकांना आयोजकांकडून पूरविले जाणार नाही.
- स्पर्धेत नमूद केलेल्या एकूण १८ बाबीपैकी अ.क्र. ५ ते १८ बाबींसाठी आवश्यक असणारे सहाय्यक कलाकार व साहित्य स्वतः आणणे व त्याबाबत आयोजकांना सूचित करणे आवश्यक आहे. तसेच वैयक्तिक नृत्य प्रकारातील परफॉर्मन्ससाठी रेकॉर्ड केलेले गाणे हे सी.डी किंवा पेनड्राईव्ह मध्येच स्विकारले जातील.
- सर्व स्पर्धकांनी नमूद केलेल्या वेळेतच स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहावे. त्यानंतर आलेल्या कोणत्याही स्पर्धकाची दखल घेतली जाणार नाही.
- स्पर्धे दरम्यान ब्रेक मध्ये अल्पोपहार/चहा घेण्यास स्पर्धकांनी वेळेतच हजर राहावे. वेळे आधी वा वेळेनंतर कोणालाही अल्पोपहार/चहा दिला जाणार नाही.
- स्पर्धा स्थळी सर्व स्पर्धकांनी संस्थेच्या नियमांचे व शिस्तीचे पालन करणे अनिवार्य आहे.
- स्पर्धा धुम्रपान / मद्यपान करणे वा कोणतेही गैरवर्तन करणे यासारखे प्रकार घडणार नाही याची दक्षता स्पर्धकांनी व सोबत आलेल्या शिक्षक / पालक यांनी घेणे आवश्यक आहे. असे आढळून आल्यास संबंधितावर कडक कारवाई केली जाईल.
- आयोजकांकडून वेळोवेळी दिल्या जाणा-या सर्व सुचना ह्या स्पर्धकांवर बंधनकारक असतील.
- एककांकिकेसाठी लेखकाचे वय हे दि. १२ जानेवारी २०१७ रोजी २९ वर्षापर्यंत असावे. तसेच सदर लेखक हा एकांकिका संघापैकीच एक असावा.
- स्पर्धकांनी आपला बायोडाटा व पासपोर्ट साईजचे दोन फ़ोटो सोबत आणावे.
- स्पर्धकांनी येतांना रिहर्सल करुन यावे. स्पर्धास्थळी कोणत्याही स्पर्धकास रिहर्सलसाठी वेळ दिला जाणार नाही.

# सर्वसाधारण नियम व सूचना

- ✓ युवा महोत्स्वामध्ये सादर करण्यात येणारे सर्व सांस्कृतिक कार्यक्रम हे भारतीय संस्कृतीतील विविध मूलभूत मुल्ये उदा. एकात्मता ,मैत्री, शांति, भक्ति, प्रामाणिकपणा, सत्यता इत्यादि भारताच्या विशिष्ट वारश्यांच्या संदर्भासह ठळकपणे दर्शविणारे असावेत. त्यातून आपल्या देशातील ऐक्य व एकात्मता यासारखे गुण प्रामुख्याने दर्शविणारे असावेत.
- ✓ मुख्य आयोजक व समन्वयक कोणत्याही क्षणी अचानक उद्‌भवलेल्या परिस्थितीनुरुप कार्यक्रमाची रुपरेषा बदलू शकतात.
- ✓ सहभागी संघ/समुहाच्या सादरीकरणाचा अनुक्रम हा आयोजकांनी जाहिर केलेल्या सोडतीनुसार राहिल.
- ✓ आयोजकांनी विहित केलेल्या वेळेत तसेच जाहीर केलेल्या अनुक्रमानुसार स्पर्धकांची / समुहाची उपस्थिती ही त्या-त्या स्पर्धकांची किंवा संबंधित समुहप्रमुखाची जबाबदारी असेल.
- ✓ सहभागी स्पर्धकांनी त्यांची स्वतःची वाद्ये अथवा इतर आवश्यक उपकरणे/वस्तू आणणे अपेक्षित आहे.
- ✓ आवश्यकता / मागणी असल्यास कार्यक्रम सहभागविषयक नोंदणी करतांना सादर केल्या जाणा-या कार्यक्रमाची कल्पना/विषय स्पष्ट करणारी टिपणी ३ प्रतींमध्ये सादर करण्यात यावी.
- ✓ स्पर्धात्मक प्रकारातील कार्यक्रमांमध्ये सिंथेसायजर सारखी इलेक्ट्रॉनिक वाद्ये/उपकरणे वाजविण्याची परवानगी देण्यात येणार नाही.
- ✓ सर्व कार्यक्रमाकरीता परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल व तो सर्व सहभागी स्पर्धकांवर बंधनकारक असेल. त्याबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार वा आक्षेप स्विकारले जाणार नाहित.
- ✓ विहित वेळेची मर्यादा पार केल्यास पाच ते दहा टक्के गुण वजा करण्यात येतील.
- ✓ आयोजक आणि त्यांच्याद्वारे नियुक्त मिटींग स्पर्धात्मक आणि बिगर स्पर्धात्मक कार्यक्रमाच्या आधी संयोजकाद्वारे विहित केलेल्या ठिकाणी होतील.

उपरोक्त महोत्सवात आयोजित होणा-या विविध स्पर्धाबाबींची नियमावली खालीलप्रमाणे राहील -

| अ.क्र. | स्पर्धा बाब | सर्वसाधारण नियम |
|---|---|---|
| १ | लोकनृत्य | ❖ एका संघात मुले व मुली मिळून जास्तीत जास्त २० स्पर्धक सहभागी होऊ शकतात ( सहकलाकारांसह )<br>❖ नृत्य प्रकार हे मूळचे असावे अथवा भारतीय लोकनृत्य प्रकार असावा |

| | | |
|---|---|---|
| | | . बॅलेट्स ( नृत्यनाटक) प्रकार सादर करता येणार नाही<br>❖ सादरीकरणास १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ दिला जाणार नाही.<br>❖ सादरीकरणापूर्वी स्टेज व्यवस्थेसाठी ५ मिनिट जास्त वेळ दिला जाईल.<br>❖ स्पर्धकांनी सादरीकरणा दरम्यान वापरलेल्या वस्तू, प्रॉप्स साडरीकरणानंतर त्वरीत बाजूला करणे हि स्पर्धकांची जबाबदारी असेल.<br>❖ परिक्षकांचे गुण हे ताल , दिग्दर्शन , वेषभुषा , मेकअप , सेट व सर्वसमावेशक सादरीकरणावर असतील.<br>❖ आधीच रेकॉर्ड केलेले म्युजिक ( टेप, सी.डी , कॅसेट आदि.) वाजवण्यास परवानगी दिली जाणार नाही. |
| २ | **लोकगीत** | • जास्तीत जास्त १० स्पर्धक सहभागी होऊ शकतात.<br>• लोकगीत हे फ़क्त भारतीय प्रादेशिक भाषांमधीलच असावे.<br>• चित्रपटातील ( हिंदी, मराठी,इंग्रजी ) कोणतेच लोकगीत सादर करता येणार नाही.<br>• लोकगीत सादर करण्यास ७ मिनिटे दिली जातील. तसेच सादरीकरणापूर्वी सेटअप साठी ४ मिनिटांपेक्षा अधिक वेळ दिला जाणार नाही.<br>• परिक्षण हे केवळ गायनाच्या गुणवत्तेवर केले जाईल.मेकअप, वेषभूषा किंवा ॲक्टींग वर असणार नाही. |
| ३ | **एकांकिका** | • एकांकिकेसाठी ४५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ दिला जाणार नाही. सादरीकरणाची वेळ आदेश देताच किंवा स्पर्धक/संघ त्यांच्या सूचना देताच यापैकी जे आधी असेल त्यानुसार वेळ सुरु केली जाईल.<br>• सहभागी स्पर्धकांची संख्या १२ पेक्षा जास्त नसावी.<br>• स्पर्धकांनी आवश्यक असलेले स्टेजवरील साहित्य, प्रॉपर्टीज ,मेकअप मटेरियल स्वतः आणायचे आहे. तसेच लाईट व सर्वसाधारण साहित्य जसे एक्स्ट्रा फ़र्निचर सादरीकरणापुर्वी सूचित केल्यास पूरविले जाईल.<br>• एकांकिका हिंदी किंवा इंग्रजी भाषेत असावी. |

| | | |
|---|---|---|
| | | स्पर्धकांनी स्पर्धा स्थळी संबंधित समूहाकडे आपल्या सादरीकरणापूर्वी किमान १ तास आधी आपली उपस्थिती द्यावी.<br>स्पर्धकांच्या गुणवत्ता, कल्पना, ॲक्टींग कौशल्य व सर्वसमावेशक परफ़ॉर्मन्स या बाबींचे परिक्षण करण्यात येईल. |
| ४ | **शास्त्रीय नृत्य**<br><br>(मणीपुरी, ओडिसी, भरतनाट्यम, कथ्थक, कुचीपुडी )) | ✓ प्रत्येक सहभागास सादरीकरणासाठी जास्तीत जास्त १५ मिनिटे दिली जातील.<br>✓ रंगमंच व्यवस्था , ध्वनीयंत्रणा , इतर आवश्यक व्यवस्था करण्यासाठी तसेच गायक वादक साथीदारांची बैठक व्यवस्था इत्यादि साठी ५ मिनिटे जास्त वेळ दिला जाईल.<br>✓ स्पर्धेचा निर्णय ताल, तंत्र, अभिनय, वेषभूशा, पदलालित्य आणि सादरीकरणाच्या एकूण प्रभावावर आधारित असेल.<br>✓ नोंदणी करतांना नृत्यप्रकारचा समावेश असल्यास सदर नृत्याशी निगडित कथा तसेच नृत्य सादरीकरणात गीत अंतर्भूत असल्यास सदर गीताचा हिंदी किंवा इंग्रजीतील अनुवाद सादर करणे आवश्यक राहील. |
| ५ | **स्वयंस्फुर्त वक्तृत्व**<br><br>**(फक्त हिंदी किंवा इंग्रजीमध्ये)** | ❖ प्रत्येक सहभागी इच्छुकास सादरीकरणासाठी जास्तीत जास्त फ़क्त ४ मिनिटे दिली जातील.<br>❖ स्पर्धकास डब्यातील चिठ्ठ्यांपैकी एक चिट्ठी निवडून त्यातील विषयावर बोलावे लागेल. बोलण्यापूर्वी तयारीसाठी १० मिनिटे दिली जातील . चिठ्ठी निवडण्यासाठी फ़क्त एकदाच संधी दिली जाईल.<br>❖ **उपरोक्त सर्व साधारण सुचना आणि नियमांमध्ये बदल होऊ शकतो तसेच सदर प्रस्तृतीकरणाबाबत निवडमंडळ तथा परिक्षक यांच्याविषयी गोपनियता बाळगण्यात येईल.** |
| ६ | **शास्त्रीय गायन** | ➢ या कार्यक्रमाच्या सादरीकरणाकरीता जास्तीत जास्त १५ मिनिटे वेळ दिला जाईल.<br>➢ रंगमंच सज्जा, ध्वनीक्षेपक यंत्रणा, सहगायक/सहवादक बैठक व्यवस्था, विवीध उपकरणांची जुळणी आदिंकरीता ५ मिनिटे जास्त वेळ देण्यात येईल.<br>➢ चित्रपटातील गीते सादर करण्यास परवानगी नसेल.<br>➢ पुरेशा विचाराअंती आणि काळजीपूर्वक राग व रचनेची निवड करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ परिक्षण हे स्वर, ताल, उच्चार,रागविषयक निवड व रचना इत्यादि.गुणधर्मांनुसार तसेच सादरीकरणातील एकूण प्रभावानुसार केले जाईल. |
| ७ | **हार्मोनियम लाईट** | - जास्तीत जास्त १० मिनिटे वेळ देण्यात येईल.<br>- रंगमंच सज्जा, ध्वनिक्षेपक यंत्रणा,सहगायक/सहवादक, बैठक इ.करीता जास्तीची ५ मिनिटे देण्यात येतील.<br>- स्पर्धकांनी स्वतःची वाद्ये आणावित.<br>- सुगम संगीत प्रकार सादर करावा.चित्रपट संगीत वगळावे.<br>- परिक्षण हे तालबध्दता,स्वर,रचना आणि सर्वसाधारण प्रभावावर अवलंबून असेल. |
| ८ | **गिटार** | ✓ जास्तीत जास्त १० मिनिटे वेळ देण्यात येईल.<br>✓ रंगमंच सज्जा, ध्वनिक्षेपक यंत्रणा,सहगायक/सहवादक, बैठक इ.करीता जास्तीची ५ मिनिटे देण्यात येतील.<br>✓ स्पर्धकांनी स्वतःची वाद्ये आणावित.<br>✓ भारतीय किंवा पाश्चिमात्य संगीतातील प्रकार सादर करावेत.<br>✓ परिक्षण हे तालबध्दता, तंत्र, वाद्यावरील हुकूमत/कौशल्य तसेच सर्वसाधारण प्रभावावर अवलंबून असेल. |
| ९ | **शास्त्रीय वादन**<br><br>**(बासरी, वीणा, सतार, तबला व मृदंगम )** | ✓ स्पर्धकांनी स्वतःची वाद्ये सोबत आणावीत.<br>✓ स्पर्धकांनी परफॉर्मन्स देतांना हिंदुस्थानी किंवा कर्नाटकी शैलीमध्येच देणे बंधनकारक राहील.<br>✓ सतार, वीणा व बासरी याकरीता १५ मिनिटे इतका वेळ देण्यात येईल<br>✓ तबला व मृदंगम याकरीता १० मिनिटे इतका वेळ देण्यात येईल.<br>✓ रंगमंच सज्जा, ध्वनिक्षेपक यंत्रणा,सहगायक/सहवादक, बैठक इ.करीता जास्तीची ५ मिनिटे देण्यात येतील.<br>✓ परिक्षण हे तालबध्दता, तंत्र, वाद्यावरील हुकूमत/कौशल्य तसेच सर्वसाधारण प्रभावावर अवलंबून असेल. |